# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र. १८८-२३** **दिनांक :- १२/०६/२०२३**

## चोरीच्या टेम्पोचा वापर करुन वेगवेगळया ठिकाणावरुन बकरे चोरी करुन विक्री करणाऱ्या टोळीस पकडण्यात गुन्हे शाखा, कक्ष २ वसई यांना यश.

आचोळा पोलीस ठाणे हददीत दिनांक ०६/०६/२०२३ रोजी रात्री ०२.०० ते ०४.०० वा दरम्यान फिर्यादी अकील खादीम कुरेशी, वय ३४ वर्षे, रा. रॉयल अपार्टमेन्ट, अलकापुरी, नालासोपारा पुर्व यांनी त्यांचे अलीया चिकण व मटण शॉप अलकापुरी, नालासोपारा पुर्व येथील दुकानात ठेवलेले ४५,०००/- रुपये किंमतीचे एकुण ४ बकरे हे अज्ञात आरोपीतांनी त्याचे दुकानाचे शटर तोडुन छोटा हाती टेम्पो मधुन चोरी करुन नेले बाबत गुन्हयातील फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आचोळे पोलीस ठाणेत दिनांक ०९/०६/२०२३ रोजी १२.२८ वा. गु.रजि.नं. २९५/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३८०, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वसई परीसरात वेगवेगळया ठिकाणी अशाच प्रकारचे गुन्हे घडल्याने सदर गुन्हे उघडकीस आणण्याकरीता वरिष्ठांनी दिलेल्या आदेशावरुन गुन्हे शाखा, कक्ष २, वसई युनिटचे अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा समातंर तपास सुरु करुन मिळालेल्या तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे बकरे चोरी करण्यासाठी चोरीचा टेम्पो घेवुन जाणा-या आरोपीत नामे १) मुस्तफा मोहम्मद आबीद हाशनी, वय २४ वर्षे, रा. सबिनाचाळ, धानीव, नालासोपारा पुर्व (वाहन चालक), २) मोहम्मद कलीम मोहम्मद कलाम कुरेशी, वय ३६ वर्षे, रा. चिंचोटी, पाटीलपाडा, वसई पुर्व, ३) ईबारतअली उर्फ सिध्दु गुलाम हुसेन खान, वय १९ वर्षे, रा. धानीवबाग तलावाचे जवळ, नालासोपारा पुर्व यांना फादरवाडीनाका, वसई पुर्व येथे सापळा रचुन चोरीच्या टेम्पोसह दिनांक ०९/०६/२०२३ रोजी ताब्यात घेतले व त्यांचेकडे अधिक विचारपुस करता त्यांनी टेम्पोचा वापर करुन वसई परीसरातुन तसेच दिवा (मुंब्रा) येथुन बकरे चोरी करुन ते मुंबई येथे विक्री केल्याचे निष्पन्न झाले आहे. नमूद आरोपीतांकडून २,५०,०००/- रुपये किंमतीचा छोटा हात्ती टाटा टेम्पो क्रमांक एम.एच.०५ बी.एच ५४९३ हा जप्त करण्यात आला असून एकुण ५ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत. सदर गुन्हयाचा पुढील तपास आचोळे पोलीस ठाणे करीत आहे.

**: - उघडकीस आलेले गुन्हे खालीलप्रमाणे :-**

| अं. नं. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नं. व कलम |
|---|---|---|
| १. | आचोळा पोलीस ठाणे | गु.र.क्र २९५/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३८०,३४ प्रमाणे |
| २. | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.र.क्र २१६/२०२३. भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| ३. | पेल्हार पोलीस ठाणे | गु.र.क्र ५५१/२०२३. भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| ४. | मुंब्रा पोलीस ठाणे | गु.र.क्र ५८२/२०२३. भा.दं.वि.सं. कलम ४५७,३८० प्रमाणे |
| ५. | महात्मा फुले चौक कल्याण | गु.र.क्र २८६/२०२३. भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष २ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक श्री. शाहुराज रणवरे, स.पो.निरी. सुहास कांबळे, सागर शिंदे, सहा.फौज. रमेश भोसले, संजय नवले, पो.हवा. चंदन मोरे, महेश पागधरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, सुधीर नरळे, दादा आडके, पोना. प्रशांतकुमार ठाकुर, पो.अंम. अमोल कोरे यांनी केली आहे.



---ooo---